जा.क्र./मनपा/ आरोग्य / 1646 / 2025
कार्यालय महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर
दि. 14 / 07 /2025

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आरोग्य विभाग

## आरोग्य विभाग, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर
## दरपत्रक सुचना

मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रचिनी-2016/233/प्र.क्र.699/कु.क. मंत्रालय मुंबई दि. 24 सप्टेंबर 2018 अन्वये आरोग्य विभाग महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर या कार्याक्षेत्रातील सोनोग्राफी केंद्रामधील नीकामी सोनोग्राफी मशीनचे निर्लेखन (Scrap) करण्याबाबत E-Waste एजन्सीची नियुक्ती करावयाची असल्याने E-Waste एजन्सीकडून, खाली नमुद केल्याप्रमाणे, दरपत्रक व कागदपत्रे/प्रमाणपत्रे मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कागदपत्रे /प्रमाणपत्रे |
|---|---|
| 1 | एजन्सीचा अद्यावत नोंदणी दाखला उदयम आधार (Udyam Aadhar) |
| 2 | पॅनकार्ड सत्यप्रत |
| 3 | जी.एस.टी.नोंदणी क्रामांक |
| 4 | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे Consent To Establish व Consent To operate देणे बंधनकारक राहील. |
| 5 | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियम 2022 नुसार Maharasthtra Enviro Power Ltd. (EPR) देणे बंधनकारक राहील. |
| 6 | बँक खाते क्रमांक व आय एफ एस सी कोड |
| 7 | परिशिष्ट -1, एजन्सीने सादर करावयाचे हमीपत्र एजन्सीच्या लेटरहेडवर |
| 8 | परिशिष्ट -3, या प्रपत्राच्या नमुन्यात सर्व कर समाविष्ठ करुन दर एजन्सीच्या लेटरहेडवर सादर करण्यात यावेत. |

- सदर दरपत्रक नमुना www.chhsambhajinagarmc.org www.aurangabadmahapalika.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- मोहरबंद दरपत्रके दि. 22/07/2025 (04.00pm) वाजेपर्यंत आरोग्य विभाग, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर मुख्य कार्यालय येथे सादर करावेत.
- दरपत्रके उघडण्याची प्रक्रिया दि. 24/07/2025 (04.30 pm) या दिवशी किंवा समितीने ठरविलेल्या इतर दिवशी करण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

1. वर नमुद वेळेत सादर करण्यात आलेले दर पत्रकच ग्राहय धरण्यात येतील.

2. वर नमुद केलेले संपुर्ण कागदपत्रे/प्रमापत्रे हे सादर करणे अनिवार्य आहे.

3. परिशिष्ट -2 मध्ये निर्लेखन करावयाच्या मशीनचे विवरण नमुद करण्यात यावे.

4. परिशिष्ट -3 या प्रपत्राच्या नमुन्यात सर्व कर समाविष्ठ करुन दर सादर करण्यात यावेत. अर्धवट माहिती भरलेले दर ग्राहय धरले जाणार नाही.

5. निर्लेखन करण्याची रक्कम ही संबधीत सोनोग्राफी केंद्रधारक अदा करतील. याकरिता महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर कोणताही खर्च करणार नाही.

6. संबधीत निविदाधारकाच्या नावावर इतर कोणत्याही संस्थेत किंवा इतर शासकीय विभागात Black List बाबतची कार्यवाही झाली नसल्याबाबतचे शपथपत्र सोबत सादर करावे लागेल.

7. यशस्वी दरपत्रकधारकाला स्वखर्चाने रुपये 500/- च्या स्टॅम्प पेपरवर कारारपत्र करुन द्यावे लागेल, त्यानंतरच कार्यालयीन कार्यादेश देण्यात येईल.

8. एजन्सीधारकास फक्त एकच दरपत्रक सादर करता येईल.

9. ई-वेस्ट एजन्सीधारकाने सोनोग्राफी मशीन निर्लेखन प्रक्रियेचा संपूर्ण व्हिडिओ हा पेनड्रायव्हमध्ये देणे बंधनकारक आहे.

10. निर्लेखन करतांना निर्माण होणा-या ई-वेस्टचे व्यवस्थापन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियामानुसार करण्यात यावे.

11. दरपत्रकाबाबत कायदेशीर अडचणी असल्यास किंवा वाद निर्माण झाल्यास त्यासाठी न्यायालयाचे ठिकाण छत्रपती संभाजीनगर (मुख्यालय) हे राहील.

12. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक स्विकारणे किंवा नाकारणे हा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

13. दरपत्रकधारक यांनी दरपत्रकासोबत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अंतर्गत त्यांच्या मालकीच्या असलेल्या मालमत्ता कराची व पाणीपट्टी कराचा भरणा दरपत्रकाच्या दिनांकापासून आर्थिक वर्षापर्यंत पूर्ण करणे अनिवार्य राहील.

14. अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांचा निर्णय अंतिम राहील.

**(डॉ. पारस मंडलेचा)**
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
तथा
समुचित प्राधिकारी
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

# परिशिष्ठ 1

## (संस्थेच्या लेटर हेडवर)

## महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग

**शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दिनांक 01 डिसेंबर 2016**

**नियम क्रमांक 4:2:5 नुसार**

मी / आम्ही ........................................................................................................या हमीपत्राव्दारे लिहून देतो की, दरपत्रक मागविणा-या प्राधिका-याबरोबर कोणत्याही प्रकारचे हित संबंध नसून हितसंबंधाबाबत संघर्ष नाही. तसेच प्राधिका-याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असुन दुस-या कोणत्याही एजन्सी सोबत संयुक्तरित्या किंवा संगनमताने साखळी करुन भरलेले नाही. असे आढळुन आल्यास नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाही साठी मी पात्र राहिल.

निविदाकाराची स्वाक्षरी व नांव

**दिनांक :-**
**स्थळ :-**

# परिशिष्ठ 2

| अ.क्र. | **निर्लेखन करण्याबाबतच्या मशीनचे विवरण** |
|---|---|
| 1 | सोनोग्राफी मशीन प्रोबसह |
| 2 | एम आर आय मशीन |
| 3 | सिटी स्कॅन मशीन |
| 4 | बी स्कॅन मशीन |

**(डॉ. पारस मंडलेचा)**
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
तथा
समुचित प्राधिकारी
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

## परिशिष्ठ 3

**(संस्थेच्या लेटर हेडवर)**

**दरपत्रक सादर करण्याचा नमुना**

| अ.क्र. | निर्लेखन करण्याबाबतच्या मशीनचे विवरण | रक्कम प्रति मशीन (Including all taxes) |
|---|---|---|
| 1 | सोनोग्राफी मशीन प्रोबसह | |
| 2 | एम आर आय मशीन | |
| 3 | सिटी स्कॅन मशीन | |
| 4 | बी स्कॅन मशीन | |

निविदाकाराची स्वाक्षरी व शिक्का सह

**(डॉ. पारस मंडलेचा)**
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
तथा
समुचित प्राधिकारी
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर